**I.I.F.-I (एकीकृत अन् वेषणफॉर्म - १)**

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 173 B.N.S.S)**

**प्रथम खबर अहवाल**

**(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)**

1. **District (जिल्हा):** सोलापुर ग्रामीण **P.S. (पोलीस ठाणे):** अक्कलकोट उत तर **Year (वर्ष):** 2025

**FIR No. (प्रथम खबर क्र.):** 0301 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 12/06/2025 01:39 वाजता

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence(गुन्हयाची घटना):**

1 **Day (दिवस):** बुधवार **Date from (दिनांक पासून):** 11/06/2025 **Date To (दिनांक पर्यंत):** 11/06/2025

**Time Period (कालावधी):** **Time From (वेळेपासून):** 11:46 तास **Time To (वेळेपर्यंत):** 14:13 तास

(b) **Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा):** **Date (दिनांक):** 12/06/2025 **Time (वेळ):** 00:27 तास

(c) **General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ):** **Entry No. (नोंद क्र.):** 002 **Date and Time (दिनांक आणि वेळ):** 12/06/2025 00:27 तास

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1. **(a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर):** दक्षिण, 2 कि.मी. **Beat No. (बीट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** स्वामी समर्थ मंदिराजवळील बेडर ,अक्कलकोट

**(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (State) (जिल्हा (राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** देवेंद्र नामदेव खाती

(b) **Father's/Husband's Name (वडिलांचे/पतीचे नाव):**

(c) **Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष):** 1990

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No. (पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख ):** **Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))**

| S. No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्र क्रमांक) |
|---|---|---|

(h) **Occupation (व्यवसाय):**

(i) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्ता प्रकार) | Address (पत्ता):: |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | तळेवाड पो बोरोटी अक्कलकोट , अक्कलकोट उत्तर, सोलापुर ग्रामीण, महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | तळेवाड पो बोरोटी अक्कलकोट , अक्कलकोट उत्तर, सोलापुर ग्रामीण, महाराष्ट्र, भारत |

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल क्र.):** 91-9922937646

**7. Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):**

**Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या):** 0

| S. No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address(वर्तमान (पत्ता)) |
|---|---|---|---|---|
| 1 | अरुण मारुती शेवाळे | | | 1. 63 ब,वंदावन पार्क,Town/Village (शहर / गाव): फेज-1,लोहगांव,पुणे,Tehsil (तहसील): Police Station (पोलीस ठाणे): अक्कलकोट उत तर,District (जिल्हा): सोलापुर ग्रामीण,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant / informant ( तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे ):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S. No. (अ.क्र.) | Propertty Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (विवरण) | Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये) |
|---|---|---|---|---|
| | | | | |

**10. Total value of property (In Rs/-) मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) :**

**11. Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):**

| S. No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.) |
|---|---|
| | |

**12. First Information contents (प्रथम खबर हकिगत):**

फिर्यादी जबाब दि.12.06.2025

मी देवेंद्र नामदेव खाती, वय- 35 वर्षे, व्यवसाय – शेती, रा. मु. तळेवाड, पो. बोरोटी, ता. अक्कलकोट जि. सोलापूर मो.नं. 9922937646 समक्ष हजर राहुन फिर्याद देतो की,

**I.I.F.-I (एकीकृत अन् वेषणफॉर्म - १)**

मी वरील ठिकाणी माझ्या कुटूंबासह राहणेस असून, माझे मोठे भाऊ निंबण्णा हे सन 2017 साली मयत झाल्याने माझी वहिनी शिवलीला व त्यांची दोन मुले यांचे देखभाल मीच करीत आहे. माझी वहिनी श्रीमती शिवलीला निंबण्णा खाती हिने आमच्या गावातील गट क्र. 57/4/ब, क्षेत्र 1 हेक्टर शेतजमिन श्री मल्लिनाथ लिंबण्णा पुजारी यांच्याकडून सह दुय्यम उपनिबंधक, अक्कलकोट यांच्याकडील दस्त क्र. 3713/2025, दि.02/06/2025 अन्वये खरेदी केली आहे. माझी वहिनी श्रीमती शिवलीला ह्या विधवा असून त्यांना महाराष्ट्र शासनाकडुन मिळणा-या संजय गांधी निराधार योजनेच्या लाभ रकमेसंदर्भात विचारणा करण्यासाठी मी दि.06/06/2025 रोजी तहसिल कार्यालय, अक्कलकोट येथे गेलो असता, माझी भेट आमच्या गावातील तलाठी अरुण शेवाळे यांच्याशी झाली, त्यावेळी मी त्यांना माझ्या वहिनी श्रीमती शिवलीला खाती यांनी घेतलेल्या शेतजमिनीविषयी माहिती दिली व त्याचे दस्तावरून सातबारा उता-यावर त्यांच्या नावाची नोंद घेणेबाबत सांगितले, त्यावेळी तलाठी अरूण शेवाळे यांनी दस्ताची छायांकित प्रत आणण्यास सांगून रु.5000/- दयावे लागतील असे सांगितले, त्यावेळी मी त्यांना पाच हजार रुपये कशाचे याबाबत विचारणा करुन सदर रक्कमेची कायदेशीर पावती असते का? अशी विचारणा केली असता, त्यांनी त्याची पावती नसते, पाच हजार रूपये दिल्याशिवाय सातबारा नोंद घेणार नाही असे सांगितले, त्यावेळी मी त्यांना ठिक आहे चार-पाच दिवसांनी दस्ताची प्रत घेवून येतो असे सांगून माझी वहिनीचे संजय गांधी निराधार योजनेचे काम झाल्यावर घरी गेलो.

काल दि.10/06/2025 रोजी मला दस्त लेखनिक शकिल पठाण यांच्याकडून दस्ताची प्रत मिळाल्यानंतर सायंकाळी साडेसहा वा.चे सुमारास मी तलाठी अरूण शेवाळे यांचे मो.क्र. 8999543017 यावर कॉल करुन माझ्या वहिनीने खरेदी केलेल्या शेतजमिनीच्या सातबारा उता-यावर त्यांचे नाव लावण्याच्या कामाबाबत चर्चा केली असता, त्यांनी उदया खरेदी दस्ताची झेरॉक्स प्रत व 5000/- रू. घेवून येण्यास सांगितले. सदर खरेदी दस्ताच्या फेरफारवरुन सातबारा उता-यावर नावाची नोंद होण्यासाठी कोणतीही शासकिय फि आकारण्यात येत नसून तलाठी अरुण शेवाळे हे माझ्याकडे लाचेची मागणी करीत असल्याची माझी खात्री झाल्यानंतर माझी वहिनी शिवलीला यांच्याशी चर्चा करुन आम्हाला लाच देण्याची इच्छा नसल्याने मी आज दि.11/06/2025 रोजी सकाळी साडेआठच्या सुमारास पोलीस निरीक्षक श्री. गणेश पिंगुवाले यांना मोबाईलवर संपर्क साधून माझ्याकडे होत असलेल्या लाच मागणीबाबत तक्रार सांगितली.

त्यानंतर आज दि.11/06/2025 रोजी पोनि पिंगुवाले यांनी सकाळी अकरा-सव्वा अकराच्या सुमारास मला संपर्क करून त्यांचे पथक व पंचासह सोलापूर ते गाणगापूर रोडवरील अक्कलकोट येथे जाणा-या रोडच्या ब्रिजखाली येऊन माझी भेट घेतली. सदरवेळी मी पोनि पिंगुवाले व त्यांच्या सोबत आलेल्या विनायक श्रीकांत कुंचपोर, कनिष्ठ सहायक, पंचायत समिती दक्षिण सोलापूर व पाडुरंग चंद्रकांत कविटकर वरिष्ठ सहायक, पंचायत समिती दक्षिण सोलापूर या दोन शासकीय पंचांची माझी आपआपसात ओळख करून दिली. त्यांनतर मी त्यांच्यासमक्ष माझी वहिनी श्रीमती शिवलीला निंबण्णा खाती हिने आमच्या गावातील गट क्र.57/4/ब, क्षेत्र 1 हेक्टर शेतजमिन श्री मल्लिनाथ लिंबण्णा पुजारी यांच्याकडून सह दुय्यम उपनिबंधक, अक्कलकोट यांचेकडील दस्त क्र.3713/2025, दि. 02/06/2025 अन्वये खरेदी केली असून सदर दस्तावरुन सातबारा उता-यावर नोंद करण्यासाठी तलाठी अरुण शेवाळे यांनी माझ्याकडे रु. 5000/- लाचेची मागणी करत असल्याबाबतची सविस्तर

तक्रार सांगुन लेखी तक्रार दिली, त्यावर पोनि पिंगुवाले, विनायक श्रीकांत कुंचपोर व पाडुरंग चंद्रकांत कविटकर या पंचानी सह्ला केल्या.

सदरवेळी पडताळणी कारवाई करण्याच्या अनुषंगाने पोनि. पिंगुवाले यांनी मला श्री अरुण शेवाळे यांची कोठे भेट होऊ शकते? याबाबत विचारले असता, त्यांना कॉल करुन विचारावे लागेल असे मी सांगितले. त्यानंतर पोनि. पिंगुवाले यांनी त्यांच्याकडील व्हाईस रेकॉर्डर व नवीन मेमरीकार्ड दाखवून व्हाईस रेकॉडरचा वापर व उपयोग याबाबत संपुर्ण माहिती मला तसेच दोन्ही पंचांना देवून व्हाईस रेकॉर्डरमध्ये नवीन मेमरीकार्ड टाकले त्यानंतर मला तलाठी शेवाळे यांना फोन करून भेटायला येत असलेबाबत सांगुन ते कुठे आहेत ? असे विचारण्यास सांगितले. त्यावेळी पोनि. पिंगुवाले यांनी व्हाईस रेकॉर्डर चालू केल्यानंतर मी तलाठी शेवाळे यांना त्यांचे 8999543017 यावर 11.46 वाजता फोन करून स्पीकर चालू ठेवला. त्यावेळी त्यांना मी अक्कलकोट येथे आले असल्याचे सांगुन भेटण्याविषयी विचारणा केली असता, त्यांनी मला कुठे आहे? याबाबत विचारणा केली, त्यावेळी मी त्यांना स्वामी समर्थ मंदिरजवळ कंटोळगी रोडवर असल्याचे सांगितले असता त्यांनी मला तिकडेच थांबण्यास सांगून ते दहा मिनिटात भेटायला येत असल्याचे सांगितले. त्यानंतर सदर ठिकाणी पडताळणी करण्याचे ठरवून सदर कारवाईकरीता पंच क्र.01 म्हणून विनायक कुंचपोर व पंच क्र.2 म्हणून पाडुरंग कविटकर असे काम करायचे ठरविले. त्यानंतर पोनि पिंगुवाले यांनी योग्य त्या सूचना देऊन त्यांच्याकडील व्हाईस रेकॉर्डर चालू करुन तो माझे गळयात अडकवून व्हाईस रेकॉर्डर माझ्या शर्टाच्या आतील बनियनच्या आतमध्ये कोणास दिसणार नाही असे अडकविले. त्यानंतर मला अरुण शेवाळे यांची भेट घेण्याकरीता पंच क्र.1 यांच्यासह मी आणलेले माझे चुलत भाऊ यल्लपा खाती यांचे टीव्हीएस कंपनीची पांढ-या रंगाची मोटार सायकल क्र. एमएच 13 ईयु 1405 यावरुन 11.50 वाजता रवाना केले. मी व पंच क्र.1 दोघे असे स्वामी समर्थ मंदिर जवळील बेडर कन्नय्या चौकाजवळ गेलो असता, सदर ठिकाणी तलाठी अरुण शेवाळे थांबलेले दिसले त्यावेळी त्याच्याजवळ जाऊन त्यांची भेट घेतली, त्यावेळी मी माझी वहिनीच्या नावाचा अर्ज, फेरफार उतारा व खरेदी दस्ताची प्रत त्यांना दिली व लवकरात लवकर काम करुन देण्यास सांगितले असता शेवाळे यांनी सदरची कागदपत्रे घेऊन त्याची पाहणी केली. त्यावेळी फेरफार उता-यावर विक्रीदाराची सही नसल्याने त्यांनी ह्याच्यावर साईन कुठाय? असे विचारणा करून त्यावर सही घेऊन नंतर आणून देण्यास सांगुन फेरफार उतारा माझ्या ताब्यात दिले. त्यानंतर शेवाळे व माझ्यामध्ये चर्चा सुरू असताना त्यांनी मला द्या असे म्हणून यापुर्वी मागणी केलेल्या लाच रकमेची मागणी केली, त्यावर मी किती असे विचारणा केली असता, त्यांनी आता किती द्यायचय द्या तुम्ही आता नाही म्हणल्यावर काय करणार तुम्हाला असे सांगितले. त्यावेळी मी त्यांना पाच हजार म्हणलाव पाच हजार मला देता येत नाही सर असे बोलून लाच रक्कम जास्त असल्याचे सांगितले. त्यानंतर चर्चेदरम्यान शेवाळे यांनी आता काय.. तुम्हाला जे द्यायचय द्या मग.. उग किरकिर करू नका.. असे सांगितले, त्यावेळी मी त्यांना नाही सर मी ते म्हणत नाही. सांगा तुम्ही फक्त. तुम्ही पाच म्हणले, पाच मला देता येतय का सर? मी गरीब हाय ओ असे सांगितलो असता, त्यांनी द्या.. तुम्हाला जे द्यायचय द्या.. असे सांगितले त्यावेळी मी त्यांना तुम्ही पाच म्हणले, मला पाच देता येतय का सर? असे बोलून लाच रकमेबाबत तडजोड केली असता, शेवाळे यांनी मग द्या, तुम्हाला दे म्हणलो की तुम्हाला असे सांगितले. त्यावर मी त्यांना दोन हजार देऊ? असे विचारले, सदरवेळी मी लाच रकमेत मोठी तडजोड

केल्याने शेवाळे यांनी रागाच्या भरात ते बी देऊ नका राहू द्या आता काय तुम्हाला.. असे सांगितले. त्यावेळी मी त्यांना नाही ओ.. सांगा. दोन हजार लई झाले साहेब.. आम्ही गरीब लोक हाय. वहिनी.. भाऊ नाही वहिनी एकट हाय. दोन मुल हायत. असे सांगितले असता, त्यांनी तीन तर द्या. जाऊदे. असे बोलून रु.3000/- लाचेची मागणी केली. त्यावर मी त्यांना तीन हजार? असे विचारले असता त्यांनी हा असे सांगितले. त्यावेळी मी त्यांना तीन हजार रूपयांची रक्कमसुध्दा जास्त होत असल्याने त्यावर तडजोड करण्याचा प्रयत्न केला, त्यावेळी त्यांनी जे तुम्हाला द्यायचय द्या. असे बोलून लगेच पैसे देण्यास सांगितले. त्यावेळी मी त्यांना एक तास मला टाईम द्या मी आणून देतो. कुठ राहता तुम्ही? वरती ऑफिसमध्ये असे सागून एक तासाची वेळ मागितली असता, त्यांनी टाईम महत्वाच असतय.. अस नसतय असे बोलून त्यांच्या मोटार साकलवरुन निघून जात असताना हाताच्या इशा-याने फोन करुन पैशे देण्यासाठी पुन्हा येण्यास सांगितले. त्यानंतर मी व पंच क्र.1 असे सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत येवून वरील हकिकत सांगितली. सदरवेळी पोनि पिंगुवाले यांनी दोन्ही पंचासमक्ष व्हॉईसरेकॉर्डरमध्ये झालेले संभाषण ऐकले असता, वरीलप्रमाणे संभाषण झाल्याचे दिसून आले. सदरवेळी शेवाळे यांनी फेरफार उता-यावर विक्रिदाराची सही घेऊन येण्यास सांगितले असल्याने मी माझ्या मोबाईलवरून विक्रीदार यांना फोन करून फेरफार उता-यावर सही लागणार आहे, त्याकरीता माझा चुलत भाऊ यलप्पा यांच्याजवळ उतारा पाठवत असल्याचे सांगितले. त्यानंतर पोनि पिंगुवाले यांनी अक्कलकोट शहरात मेडिकल दुकानात कामास असलेले माझे चुलत भाऊ यलप्पा यास फोन करून आम्ही थांबलेल्या ठिकाणी येण्यास सांगितले. यलप्पा हा अक्कलकोट शहरामध्ये जवळच असल्याने तो सदरठिकाणी येऊन माझ्याकडून फेरफार उतारा घेऊन अक्कलकोट शहरापासून 3 किमी अंतरावर दोडयाळ या गावात राहणारे विक्रिदार पुजारी यांची सही घेण्यासाठी गेला. काहीवेळाने यलप्पा याने सदर फेरफार उता-यावर विक्रीदार यांची सही घेऊन माझ्याकडे आणून दिले.

सदर पडताळणी कारवाईदरम्यान तलाठी अरुण शेवाळे यांनी माझ्याकडे तडजोडीअंती 3,000/- रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याने पोनि. पिंगुवाले यांनी अरुण शेवाळे यांच्यावर सापळा कारवाई करण्याचे ठरवून सापळापुर्व कारवाईबाबत माहिती देऊन मला व पंचाना अँथ्रासिन पावडरच्या गुणधर्माबाबत माहिती देऊन त्याचा वापर व उपयोग सांगुन प्रात्यक्षिक दाखविले. सदर वेळी मी हजर केलेले 3,000/- रू. रक्कमेच्या नोटांचे क्रमांक एका कागदावर लिहुन घेतल्यानंतर चालक पोहेकॉ/984 गायकवाड यांच्या हस्ते नोटांना अँथ्रासिन पावडर लावुन सदरच्या नोटा माझ्या पॅन्टच्या उजव्या बाजुच्या पुढच्या खिशात ठेवले. त्यानंतर पोनि. पिंगुवाले यांनी मला श्री अरुण शेवाळे यांना फेरफार उता-यावर विक्रीदार यांची सही आणली असल्याचे सांगून भेट कोठे भेट होऊ शकते? याबाबत विचारणा करण्याचे सांगितले. त्यावेळी पोनि. पिंगुवाले यांनी व्हाईस रेकॉर्डर चालू केला. सदरवेळी मी तलाठी शेवाळे यांना त्यांचे 8999543017 यावर 13.42 वाजता फोन करून स्पीकर चालू ठेऊन कुठे आहे असे विचारले असता त्यांनी सकाळी, सकाळी थांबलेल्या जागी.. असे सांगून पडताळणीवेळी भेटलेल्या ठिकाणी येण्यास सांगितले. त्यानंतर पोनि. पिंगुवाले यांनी मला, दोन्ही पंचांना व सापळा पथकातील अंमलदारांना त्यांच्या कामाच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या तसेच सापळा कारवाईनंतर लोकसेवक यांच्या अंगझडतीचे मोबाईलवर चित्रीकरण करण्याबाबत सहा फौजदार कोळी यांना सुचना दिल्या. त्यानंतर पोनि पिंगुवाले यांनी व्हाईस रेकॉर्डर चालू करून ते

माझ्या शर्टाच्या आतील बाजूस बनियानच्या आत गळयात अडकवून मला व पंच क्र.1 असे दोघांना माझ्याकडील दुचाकीवरून 13.47 वाजता रवाना केले. आमच्या पाठोपाठ पोनि पिंगुवाले हे पंच क्र.2 व सापळा पथकासह शासकिय वाहनाने आमच्या पाठीमागे येवून स्वामी समर्थ मंदिर जवळील बेडर कन्नय्या चौकाजवळ येवून शासकिय वाहन पार्किंगमध्ये थांबवून बेडर कन्नय्या चौकात तसेच श्री वटवृक्ष कोल्ड्रींक्स अँन्ड जनरल स्टोअर्स व चहा टपरीजवळ कोणास संशय येणार नाही याप्रमाणे सापळा लावून थांबले.

मी व पंच क्र.1 असे दोघे स्वामी समर्थ मंदिर जवळील बेडर कन्नय्या चौकाजवळ थांबलेले असताना, मी माझ्या मोबाईलवरून तलाठी शेवाळे यांना त्यांचे वर नमुद मोबाईल क्रमांकावर फोन करून, त्याचे स्पिकर ऑन केला आणि त्यांच्या ठावठिकाण्याबाबत विचारले असता, त्यांनी बेडर कनय्या

येवून शासकिय वाहन पार्किंगमध्ये थांबवून बेडर कन्नय्या चौकात तसेच श्री वटवृक्ष कोल्ड्रींक्स अँन्ड जनरल स्टोअर्स व चहा टपरीजवळ कोणास संशय येणार नाही याप्रमाणे सापळा लावून थांबले.

मी व पंच क्र.1 असे दोघे स्वामी समर्थ मंदिर जवळील बेडर कन्नय्या चौकाजवळ थांबलेले असताना, मी माझ्या मोबाईलवरून तलाठी शेवाळे यांना त्यांचे वर नमुद मोबाईल क्रमांकावर फोन करून, त्याचे स्पिकर ऑन केला आणि त्यांच्या ठावठिकाण्याबाबत विचारले असता, त्यांनी बेडर कन्नय्या चौकात येत असल्याचे सांगितले. थोडया वेळाने तलाठी अरुण शेवाळे हे त्यांच्याकडील हिरो कंपनीची पॅशन प्लस मोटारसायकल, त्याचे रजि. क्र.केएल 13 एम 4651 यावरून सदर ठिकाणी आले, त्यावेळी मी त्यांना चहा घेवू असे सांगुन पंच क्र.1 व शेवाळे यांच्यासह समोरच असलेल्या श्री वटवृक्ष कोल्ड्रींक्स अँन्ड जनरल स्टोअर्स व चहा टपरी येथे जावून चहा पित उभारलो. सदरवेळी चर्चेदरम्यान शेवाळे यांनी तुमच्यामुळ सरपंचामुळ लय मदत केलो.. तरी.. कंटीन्यु रात्री दिवसा फोन केला तरीपण मी म्हणलो.. कधी नाय…चांगल होऊ द्या त्याच.. दहा पंधरा हजार रुपये वाचवलो तरी तुमच ते असे सांगितले. त्यावेळी मी त्यांना ते तर बरोबर हाय की..ते ई पीक पाणी आमाला करावाच लागील की सर.. असे सांगितले. त्यावर त्यांनी तुमचे सात बारा काढायलाच गेले असतील माझे पाचशे रुपये असे सांगितले, त्यानंतर चर्चेदरम्यान मी विक्रीदार यांची सही घेऊन आणलेला फेरफार उतारा शेवाळे यांच्याकडे दिले असता, त्यांनी हाताच्या इशा-याने लाच रक्कमेची मागणी केली. त्यावेळी मी त्यांना माझ्या पॅन्टच्या समोरील उजव्या बाजूच्या खिशातील लाच रक्कम काढून त्यांच्यासमोर धरली असता, त्यांनी सदर रक्कम त्यांच्या उजव्या हाताने स्विकारली, त्यावेळी मी त्यांना तीन हजार हाय घ्या मोजून..परत आमच्यावर हे करू नका. असे बोलून लाच रक्कम मोजून घेण्यास सांगितले. शेवाळे यांनी माहिती हाय तुम्हाला म्हणुन मी म्हणल मोजायच नसतय जे हाय ते ठिक असे बोलून लाच रक्कम स्विकारुन त्यांच्या पॅन्टच्या उजव्या बाजुच्या पुढच्या खिशात ठेऊन घेतले. सदरवेळी श्री वटवृक्ष कोल्ड्रींक्स अँन्ड जनरल स्टोअर्स येथील चहा टपरीवर सापळा लावुन बसलेले पोनि पिंगुवाले व सापळा पथकातील अंमलदार यांनी तलाठी शेवाळे हे लाच रक्कम स्विकारल्याचे पाहून त्यांना ताब्यात घेतले. सदरचे ठिकाण हे सार्वजनिक ठिकाण असून सदरठिकाणी लोकांची गर्दी व उजेड असल्याने अक्कलकोट उत्तर पोलीस ठाणे अंकित अक्कलकोट चौकीत घेवून गेले. त्यानंतर पोनि पिंगुवाले यांनी माझे गळयातील व्हाईस रेकॉर्डर काढून तो बंद करुन ताब्यात घेतला, ती वेळ 14.13 वा.ची होती. सदरवेळी सहा फौजदार कोळी यांनी अरूण शेवाळे यांच्या

अंगझडतीचे मोबाईलवर चित्रीकरणास केले. अरूण शेवाळे यांना ताब्यात घेतल्यानंतर पोनि पिंगुवाले यांनी शेवाळे यांना नाव व पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे नाव अरुण मारुती शेवाळे, वय 53 वर्षे, पद- ग्राम महसूल अधिकारी, सजा- संगोगी(ब), तहसिल- अक्कलकोट सध्या राहणार-डबरे गल्ली, अक्कलकोट, सचिन हन्नुरे यांच्या घरी भाडेतत्वावर व मूळ रा. 63 ब, वृंदावन पार्क, फेज-1, लोहगांव, पुणे असे सांगितले. सदरवेळी पोनि पिंगुवाले यांनी शेवाळे यांना तक्रारदार यांच्याकडून स्विकारलेली रक्कम कोठे ठेवली आहे याबाबत विचारली असता त्यांनी त्यांच्या पॅन्टच्या समोरील उजव्या बाजूच्या खिशात ठेवले असल्याचे सांगितले. त्यावेळी पोनि पिंगुवाले यांच्या सुचनेवरून शेवाळे यांनी त्यांच्या पॅन्टच्या खिशातील रक्कम काढून पंच क्र.2 पांडूरंग कविटकर यांच्याकडे दिली. सदर रक्कम पोनि पिंगुवाले यांनी तपासून पाहिली असता, को-या कागदावर लिहून घेतलेली व अँन्थ्रासीन पावडर लावून ठेवलेल्या नोटा असल्याचे दिसून आले. त्यानंतर पोलीस चौकीमधील दारे, खिडक्या व लाईट्स बंद करून शेवाळे यांचे उजवे हात व पॅन्टच्या समोरील उजव्या बाजूच्या खिशाची तसेच त्यांच्या ताब्यातून मिळुन आलेल्या नोटांचे अल्ट्रा व्हॉयोलेट दिव्याच्या प्रकाशात दोन्ही पंचांच्या समक्ष तपासणी केली असता, सदरठिकाणी अँन्थ्रासीन पावडरची चकाकी दिसून आली. त्यानंतर झालेल्या सापळा कारवाईबाबत श्री विनायक मगर, तहसिलदार, अक्कलकोट यांना माहिती देवून पुढील सविस्तर पडताळणी, सापळापुर्व व यशस्वी सापळा पंचनामा तसेच इतर आवश्यक कार्यवाही लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सोलापूर येथे पुर्ण करण्यात आले.

तरी आज दि.11/06/2025 रोजी 11.46 ते 14.13 वा चे दरम्यान लोकसेवक श्री अरुण मारुती शेवाळे, वय 53 वर्षे, पद- ग्राम महसूल अधिकारी, सजा- संगोगी(ब), तहसिल- अक्कलकोट सध्या राहणार- डबरे गल्ली, अक्कलकोट, सचिन हन्नुरे यांच्या घरी भाडेतत्वावर व मूळ रा. 63 ब, वृंदावन पार्क, फेज-1, लोहगांव, पुणे यांनी स्वामी समर्थ मंदिराजवळील बेडर कन्नय्या चौक, अक्कलकोट येथे माझी वहिनी श्रीमती शिवलीला निंबण्णा खाती हिचे गट क्र. 57/4/ब, क्षेत्र 1 हेक्टर शेतजमिन खरेदी केलेल्या खरेदी दस्त क्र. 3713/2025 वरुन सातबारा उता-यावर त्यांचे नाव लावण्यासाठी स्वत:करीता कायदेशीर परिश्रमिकाखेरीज अन्य पारितोषण म्हणुन माझ्याकडे रु.5000/- लाचेची मागणी करुन तडजोडीअंती रु.3000/- लाचेची मागणी करून रुपये 3,000/- लाच रक्कम स्वत: स्विकारून बेकायदेशीर आर्थिक फायदा मिळवुन गुन्हेगारी स्वरूपाचे वर्तन केले आहे म्हणून माझी त्यांचेविरूध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझा वरील फिर्यादी जबाब हा आपलेकडील लॅपटॉपवर टंकलिखीत करण्यात आलेला असून त्याची प्रिंट काढल्यानंतर मी वाचून पाहिला तो माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर आहे.

हा फिर्यादी जबाब दिला. स.ता.म.

समक्ष

(गणेश पिंगुवाले)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सोलापूर

**13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):**

**(1)** **Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** **or (किंवा):**

**(2)** **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):** NILESH NATHA BAGAV **Rank (हुद्दा):** पोलीस उपनिरीक्षक

**No. (क्र.):** 15101000402NNBM8501M **to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3)** **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):** **or (किंवा)**

**(4)** **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):** **on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून).**

**F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)**

**R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)**

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** RAJENDRA RANGNATH TAKANE

**Rank (हुद्दा):** I (Inspector)

**No. (क्र.):** PBMH79447

**14. Signature / Thumb impression of the complainant / informant (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)**

**15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)**

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / seen )**
**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील)**

| S. No. (अ.क्र) | Sex (लिंग) | Date / Year Of Birth (जन्मतारीख वर्ष) | Build (बांधा) | Height (cms) (उंची(से.मी) | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| **1** | **2** | **3** | **4** | **5** | **6** | **7** |
| 1 | पुरुष | 1972 | | - | | **चेचक:** क्र. |

| Deformities / Peculiarities (व्यंग वैशिष्टये) | Teeth (दात) | Hair (केस) | Eye (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit (s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| **8** | **9** | **10** | **11** | **12** | **13** |
| | | | | | |

| Language/Dialect (भाषा/बोली) | Place of (चे ठिकाण) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| **14** | **15** | **16** | **17** | **18** | **19** | **20** |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल)**